# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/09/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## अॅल्युमिनीअम तार चोरी

पो.स्टे. मौदा :— अंतर्गत १८ कि.मी. अंतरावरील मौजा झरप ते चिखली शिवार, ता. कामठी येथे दिनांक २४/०९/२०२३ चे ०१:०० वा. ते ०१:३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— श्री शेषराव निलकंठ तितरमारे, रा. वडोदा महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी कामठी जि. नागपुर हे मौजा झरप ता. चिखली शिवारातील लाईन बंद असल्याने फिर्यादी घटनास्थळी गेले असता असे आढळुन आले की, मौजा झरप ते चिखली रोडवरील शिवारातील ४२ पोल वरील ५५ एस पी एम. एम. चे अॅल्युमिनियम तार कोणीतरी अज्ञात चोराने कापुन चोरून नेल्याचे दिसले त्यामुळे महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीचे २,४५,०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा हरिश यंगलवार मो. नं. ९४२३२१९४२९ हे करीत आहे.

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## पोलीस स्टेशन सावनेरची कार्यवाही

दिनांक २४/०९/२०२३ रोजी पोलीस स्टेशन सावनेर येथील स्टाफ सावनेर हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पाटणसावंगी शिवार येथे आरोपी नामे— **१) वामनराव आनंदराव गायकवाड, वय ४० वर्ष रा. पाटनसावगी ता. सावनेर जि. नागपुर २) राजु गुनाजी शेन्डे, वय ४० वर्ष, रा. पाटनसावंगी ता. सावनेर जि. नागपुर ३) शामबाबु नारायन पेटकर वय ३६ वर्ष, रा. वार्ड क्र. ०४ पाटनसावगी ता. सावनेर जि. नागपुर ४) गजानन माधवराव उके, वय ४२ वर्ष रा. दहेगाव जोशि महादुला ता सावनेर जि. नागपुर ५) सलिम करीम शेख वय ४३ वर्ष रा. पाटनसावगी ता. सावनेर जि. नागपुर** हे पाटणसावंगी धापेवाडा मार्गावरील असलेल्या कोलार नदीचे पात्रात विनापरवाना अवैधरीत्या ट्रॅक्टरमध्ये घमेले व फावडयाने रेती मालक याचे सांगणेवरूण रेती भरून चोरी करतांना मिळुन आले १) ट्रॅक्टर क्रमांक एम एच ४०/एल ५१२७ लाल रंगाचा मुडा महींद्रा कंपनिची टॉली क्र. एम एच ३१/झेड २८१२ किंमती टॉलीसह ५०००००/—रू व अर्धा ब्रास रेती किंमती २०००/—रू, २) ट्रॅक्टर क्रमांक एम एच ४०/ए एम १७८९ महींद्रा कंपनिचा लाल रंगाचा मुडा व ट्रॉली क्र. एम एच ४०/एल—९८९२ किंमती ५०००००/—रू रेती एक ब्रास किंमती ४०००/—रू ३) क्रमांक एम एच ४०/एल ६३६२ महीन्द्रा कंपनिचा सरपंच ट्रॅक्टर लाल रंगाचा मुडा व ट्रॉली क्रमांक दिसुन येत नाही किंमती ५०००००/—रू व एक ब्रास रेती किंमती ४०००/—असा एकुण तिन्ही ट्रॅक्टरची टॉलीसह किंमती १५.००.०००/—रू व रेतीची एकुण किंमती १००००/—रू असा एकुण १५,१०,०००/—रू, वर नमुद तिन्ही ट्रॅक्टर चालक हे मालकाचे सांगणेवरूण विनापरवाना अवैधरीत्या चोरी करतांना मिळुन आल्याने सदरचे ट्रॅक्टर व रेतीसह ट्रॉली जप्त करण्यात आली.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, १०९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार बंडु कोकाटे, मो. नं. ९८२३९४३६०५ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत ०६ कि. मी. अंतरावरील मौजा पोटा शिवार येथे दिनांक २४/०९/२०२३ चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— राजेश देवराव कांबळे, वय ५१ वर्ष, रा. वार्ड क्रमांक एक जय भोले नगर चणकापूर हा ग्रामपंचायत पोटा येथे वॉटर फिल्टर सेक्शन मध्ये पंप ऑपरेटरचे काम करतो व त्याच्यासोबत नाईट डयुटीला वॉचमन रामदास इंगोले हा सुद्धा राहतो. यातील फिर्यादी हा आपल्या डयुटीवर हजर असताना तो व त्याच्या सोबत वॉचमन यांनी आवारातील सौरऊर्जेच्या पोलकडे जाऊन पाहिले असता तेथील दोन इलेक्ट्रॉनिक पोल सौर ऊर्जेचे उभे असलेले किंमती अंदाजे ५०००/— रुपये तसेच एक लोखंडी मोठा हंडा जुना पुराना किंमती ५०००/— रुपये तसेच ग्रामपंचायत येथील पाण्याच्या टाकीच्या भोवतालची लोखंडी रॅलींची पाईप किंमती २०००/— हजार रुपये असा एकूण १२,०००/—रुपयाचा मुद्देमाल रात्रीच्या दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार रेवतकर मो. क्र. ९५४५५२३७३६ हे पोस्टे खापरखेडा हे करीत आहे.

## जबरी संभोग

**पो.स्टे. खापरखेडा :—** दिनांक २४/०९/२०२३ चे ११/०० वा. ते १२/१५ वा. दरम्यान यातील विधी संघर्ष बालक याने फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय ०३ वर्ष ६ महिने २५ दिवस ही अल्पवयीन असल्याचे माहीत असताना देखील तिचाशी शारिरिक संभोग (बलात्कार) केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे विधी संघर्ष बालक याचे विरूद्ध कलम ३७६ (ए.बी) भादंवि सहकलम ४, ८ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक फौजदार मलकुरवार मॅडम पो.स्टे. खापरखेडा मो. नं. ९६२३६८७६२७ या करीत आहे.

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

## पोलीस स्टेशन भिवापूरची कारवाई

**पोस्टे भिवापूर :–** अंतर्गत २० कि.मी. अंतरावरील मौजा मालेवाडा फाटा येथे दिनांक २४/०९/२०२३ चे १४.३० वा. दरम्यान पोलीस स्टेशन भिवापूर येथील स्टाफ यांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे भिवापूर हद्दीतील मौजा मालेवाडा फाटा येथे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची टिप्पर व्दारे चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून मौजा मालेवाडा फाटा येथे पोलीस स्टेशन भिवापूर येथील पोलिस स्टाफ यांनी नमुद घटनास्थळी जावून चेक केले असता टिप्पर क्र. एम.एच.– ४०/ बी एल– ४७१८ चा चालक **आरोपी चालक नामे – राहुल रमेश खेरवार, वय २६ वर्षे, रा. सेनापती नगर दिघोरा नागपुर** हा भिस्सी कडुन टिप्पर मध्ये बिनापरवाना रेती भरून भिवापुर मार्गे राष्ट्रीय महामार्ग क्र. ३५३ ई रोडने नागपूरकडे जात असता त्यास परवाना विचारले असता त्याने परवाना सादर केला नाही. त्यावर सदर आरोपी हा त्याचे ताब्यातील स्वत:चे वाहनात शासनाचे ताब्यातील अंदाजे ०६ ब्रास रेती किंमती ३००००/– रूपयाचा मुद्देमाल एक पांढऱ्या निळया रंगाचे १० चक्का टिप्पर क्र. एम. एच.– ४० बी एल–४७१८ किंमती २०,००,०००/– रू. टिप्पर मध्ये भरून असलेले ०६ ब्रास रेती प्रत्येकी ५,०००/– रू ब्रास प्रमाणे एकुण किंमती ३०,०००/– रू. असा एकुण २०,३०,००० रूपयाचा मुद्देमाल जप्त केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सर्फो/१२७० अशोकसिंग ठाकुर वय ५१ वर्षे, पोस्टे भिवापुर मो. नं. ९८२२६४३७७९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**